वर्ष- ११ | अंक- २७ | मुंबई, मंगळवार, २० मे ते २६ मे २०२५ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती | मराठी साप्ताहिक | मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2 नैसर्गिक लुकसाठी लिपस्टिक ऐवजी या गोष्टी वापरुन पहा

3 → उरापोटी? कोणासाठी?

ई-ऑफिस प्रणालीचा नागरिकांना ताप... ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# मुंबईत दोन करोनाबाधित रुग्णांचा मृत्यू

**मुंबई** : हाँगकाँग आणि सिंगापूरमध्ये करोनाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत असताना मुंबईतील केईएम रुग्णालयामध्ये करोनाबाधित असलेल्या दोन रुग्णांचा मृत्यू झाला. मात्र हे मृत्यू करोनामुळे झाले नसून त्यांच्यावर उपचार सुरू असलेल्या आजारामुळे झाल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. केईएम रुग्णालयात रविवारी सकाळी ५८ वर्षीय एका महिलेचा संशयित करोनाने मृत्यू झाला असल्याचे उघडकीस आले. परळ येथे राहत असलेल्या या ५८ वर्षीय महिलेला १४ मे रोजी श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने तिला केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयाच्या रुग्णकक्ष क्रमांक २० मध्ये तिच्यावर उपचार सुरू होते. रविवारी सकाळी तिचा मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी घेण्यात




**मुंबईतील केईएम रुग्णालयामध्ये संशयित करोनाबाधित दोन रुग्णांचा मृत्यू झाला. हे मृत्यू करोनामुळे झाले नसून त्यांना असलेल्या सहव्याधीमुळे झाल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.**

आलेल्या स्वॅबच्या चाचण्यांमध्ये इतर कोणत्याही आजारांची लागण असल्याचे आढळले नाही. मात्र आरटीपीसीआर चाचणीच्या अहवालामध्ये त्या महिलेला करोना असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे मृत्यूचे कारण करोना असल्याचे दिसते, असे माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी माध्यमांना सांगितले. त्याचप्रमाणे काही दिवसांपूर्वी केईएम रुग्णालयामध्ये १३ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला होता. या दोन्ही रुग्णांना करोना झाला असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले. मात्र या दोन्ही रुग्णांचा मृत्यू करोनामुळे झाला नसल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### सहव्याधी कारणीभूत

५८ वर्षीय महिलेचा कर्करोगामुळे, तर १३ वर्षीय मुलीचा मूत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू झाल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. दोन्ही रुग्णांच्या मृत्यूपूर्वी केलेल्या आरटीपीसीआर चाचणीच्या अहवालामध्ये त्या करोनाबाधित असल्याचे निदान झाले असले तरी या दोन्ही रुग्णांचा मृत्यू करोनामुळे झाला नसल्याचे केईएम रुग्णालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. संदेश परळकर यांनी सांगितले.

### घाबरू नका .

करोनानंतर रुग्णालयामध्ये दाखल होणाऱ्या प्रत्येक रुग्णाची आरटीपीसीआर चाचणी करण्याचा नियम झाला आहे. करोना आता सर्वसाधारण तापासारखा आजार झाला आहे. ज्यांना श्वास घेण्यास त्रास, खोकला किंवा गंभीर सर्दी आहे त्यांच्यात सामान्यतः करोनाचे विषाणू आढळत असल्याने त्यांचा अहवाल बाधित येतो. त्यामुळे हा विषाणू परत आला आहे किंवा तो पुन्हा पसरत आहे, असा त्याचा अर्थ होत नाही.

या महिलेच्या व मुलीच्या मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण करोना हे नसून ते वेगळे आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही, असे केईएम रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मोहन देसाई यांनी सांगितले.

### आठवड्यात १५ रुग्ण

मागील आठवड्या करोना बाधित १५ रुग्ण आढळले होते. अशी माहिती केईएम रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मोहन देसाई यांनी दिली.

# कृत्रिम वाळू धोरणाबाबत मोठा निर्णय
## मंत्रिमंडळाने दिली मंजुरी, काय होणार फायदा

■**मुंबई । प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेटची आज बैठक झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली. या बैठकीत कृत्रिम वाळू धोरणाविषयी मोठा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पर्यावरण नुकसान टळणार आहे. तर वाळूच्या माध्यमातून ग्रामीण भागात पसरलेल्या गुंडगिरी आणि वाळू माफियाना मोठा दणका बसला आहे.



रस्त्यावर राहणाऱ्या अथवा भटकंती करणाऱ्या बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी पण धोरण आखण्यात आले. राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत करण्यात आला आहे. इतर ही काही धडाडीचे निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतले आहे.

### हे आहेत मंत्रिमंडळ निर्णय

- रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजनेस मान्यता. २९ महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ३१ मोबाईल व्हॅन, यासाठी सुमारे ८ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. (महिला व बालविकास विभाग)
- नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना ह्यहोम स्वीट होमह्ण अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्टयाच्या दस्तऐवजास मुद्रांक शुल्क कमी करुन केवळ एक हजार रुपये आकारणार आहे. (महसूल विभाग )
- कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणास मंजुरी ह्र प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/ संस्थांना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देणार, एम-सँड तयार करणाया युनिटला २०० रुपये प्रतिब्रास इतकी सवलत देणार. पर्यावरणाची हानी टळणार आहे. (महसूल विभाग)
- राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत. ८० कोटींचा भार राज्य सरकार स्वीकारणार आहे. (वित्त विभाग)
- राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरण - आयटीआयला जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात रुपांतरित करणे हा मुख्य हेतू, उद्योग आणि आयटीआयच्या समन्वयातून रोजगारक्षमता वाढणार, प्रॅक्टिकल लर्निंग आणि अप्लाईड लर्निंगचे उद्देश साध्य होणार आहे. (कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग)
- राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातील उपकेंद्रासाठी चिंचोली (ता. कामठी) जिल्हा नागपूर येथील २०.३३ हेक्टर आर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. (महसूल विभाग)

# नालेसफाईची कामे 'फास्ट ट्रॅक' वर



**मुंबई** : यंदा मान्सूनचे आगमन लवकर होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने नालेसफाईला गती दिली आहे. मध्य रेल्वेने आतापर्यंत ७५ टक्के, तर पश्चिम रेल्वेने ८० टक्के नालेसफाई पूर्ण केली आहे. ३१ मेपर्यंत नालेसफाईची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे रेल्वेच्या अधिका[illegible]यांनी सांगितले.

मुंबईसह राज्यात ३१ मेपर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात होईल, अशी शक्यता आहे. पावसाळ्यात रुळांमध्ये पाणी साचून वाहतुकीचा खोळंबा होक नये, यासाठी नालेसफाई होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने रुळांलगत असलेली गटारे, नाले स्वच्छ असणे आणि त्यातून पाण्याचा योग्य निचरा होणे आवश्यक आहे. मुंबई महापालिकेच्या निधीतून रेल्वे प्रशासन ही कामे करीत आहे.

मायक्रो टनेलिंगचे काम मार्गी

एप्रिलपासून सुरू झालेल्या नालेसफाईच्या कामात मध्य रेल्वेने आतापर्यंत ७५ टक्के काम पूर्ण केले आहे. सायन-कुर्ला, विक्रोळी घाटकोपर सँडहर्स्ट रोडजवळ या माध्यमातून पाणी थेट महापालिकेच्या मुख्य नाल्यात सोडले जाणार आहे. पाशिवाय कुर्ता-चुनाभट्टीदरम्यान हार्बर मार्गावर पाणी साचण्याच्या समस्येवर रुळांची उंची वाढविण्यात आली आहे. नालेसफाईसह पाणी साचू नये, यासाठी रुळालगतच्या उपाययोजना जवळपास पूर्ण झाल्या आहेत. मान्सूनपूर्व तयारी अंतिम टप्प्यात आहे. कचरा न टाकण्यासाठी जनजागृतीही सुरू आहे. - डॉ. स्वप्निल नीला, मुख्य जनसंपर्क अधिकारी,

मध्य रेल्वे गेल्या वर्षीप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येत आहेत, स्थानिक महापालिकांसोबत समन्वय ठेवत पूरप्रवण भागात वॉटर लेव्हल मॉनिटरिंग यंत्रे बसविली आहेत. तुळशी, विहार, पवई नद्यांची तपासणीदेखील पूर्ण झाली आहे. विनीत अभिषेक, मुख्य जनसंपर्क अधिकारी, पश्चिम रेल्वे

# ओव्हर स्पीडबद्दल एसटीच्या चालकांकडून लाखोंचा दंड वसूल !



**मुंबई** : मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर आर.टी. ओ.ने घालून दिलेली ताशी ८० किलो मिटर व घाट सेक्शन मध्ये ताशी ४० किलोमीटरची वेग मांदा ओलांडल्या बद्दल बऱ्याच एसटी वाहनांवर कारवाई करण्यात आली असून आता पर्यंत लाखो रुपयांच्या दंडाच्या रक्कमेची वसुली सदर वाहन चालविणाऱ्या चालकाच्या पगारातून करण्यात आली आहे.

विशिष्ट परिस्थितीत प्रवाशांना ठरवून दिलेल्या वेळेत उचित स्थळी पोहोचविण्यासाठी किंवा रस्त्यातील वाढलेल्या वाहतुकीचा विचार करून वेग मयार्दा किंचित वाढल्यास एसटी ही सार्वजनिक वाहतूक सेवा देणारी संस्था असल्याने एसटीच्या वाहनाला दंडाच्या रक्कमेत शिथिलता देण्यात यावी. महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसची मागणी करत आहे. आता पर्यंत ६ कोटी पेक्षा जास्त दंड आरटीओकडून वसूल करण्यात आला आहे.

ठाणे विभागाकडून ८० लाख रुपये दंड वसूल केला आहे. कुठे व किती रुपये दंड वेग मयार्दा तोडली, तर ४००० रुपये लेन कटिंग १००० रुपये सिग्नल जप ५०० रुपये गर्दीच्या ठिकाणी गाडी थांबविल्यास १००० ते १५०० रुपये स्टॉप शिवाय इतर ठिकाणी गाडी थांबविल्यास १००० ते १५०० रुपये

# आता आयआयटी मुंबईने टाकला तुर्कीवर बहिष्कार, विद्यापीठांसोबतचा सामंजस्य करार रद्द

**मुंबई**: भारतात तुर्कीविरुद्ध निदर्शनाची मालिका सुरूच आहेत. देशात प्रत्येक तुर्की वस्तूंवर बहिष्कार टाकला जात आहे. तुकीर्ला भारतातून संगमरवरी आणि सफरचंदांचा व्यापार थांबवण्याच्या घोषणेनंतर, देशातील अनेक मोठ्या संस्थांनीही तुकीसोबतचे त्यांचे करार रद्द केले आहेत. या यादीत आयआयटी मुंबई देखील सामील झाले आहे. आयआयटी मुंबईनेही तुर्की विद्यापीठांसोबतचे सर्व करार रद्द केले आहेत. तुर्की आणि भारत यांच्यातील सध्याची भू-राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. आयआयटी मुंबईने म्हटले आहे की, पुढील सूचना मिळेपर्यंत तुकीसोबतचे शैक्षणिक सहकार्य स्थगित राहील.




### तुकीसोबतचे शैक्षणिक सहकार्य स्थगित

आयआयटी मुंबईने विद्यार्थी आणि प्राध्यापकांना तुकीर्शी संबंधित कोणत्याही देवाणघेवाण किंवा संशोधन कार्यक्रमांबाबत अधिकृत माहितीला स्थगिती देण्यास सांगितले आहे. यापूर्वी आयआयटी रुरकी, जेएनयू आणि जामिया मिलिया इस्लामिया सारख्या संस्थांनीही तुर्की संस्थांसोबतचे सहकार्य संपवले आहे. देशाच्या सुरक्षेला आणि हितांना प्राधान्य देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे आयआयटी मुंबईच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. तुर्कीवर पाकिस्तानला लष्करी मदत केल्याचा आरोप आहे, ज्यामुळे भारतभर त्याविरुद्ध निदर्शने होत असून, या पार्श्वभूमीवर 'बहिष्कार तुर्किए' मोहिम देशभरात राबवली जात आहे.

जेएनयू, (JNU), जामिया आणि आयआयटी रुरकी यांनीही सामंजस्य करार केला रद्द

जेएनयूने तुर्कीच्या इनोनू विद्यापीठासोबतचा सामंजस्य करार स्थगित केला आहे. त्याच वेळी, जामिया मिलिया इस्लामियानेही राष्ट्रीय सुरक्षेचा हवाला देत तुर्की संस्थांसोबतचे सर्व प्रकारचे सहकार्य थांबवण्याची घोषणा केली आहे. तसेच आयआयटी रुरकीने तुकीर्तील इनोनू विद्यापीठासोबतचा सामंजस्य करार औपचारिकपणे रद्द केला आहे.

# धार्मिक पशुवधाच्या परवानगीसाठी यंदा महानगरपालिकेकडून ऑनलाईन सुविधा

**मुंबई** : बकरी ईदनिमित्त धार्मिक पशुवधाच्या परवानगीचा अर्ज करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे यंदा पालिकेच्या ॲप्लिकेशनवर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच, म्हैसवर्गीय प्राणी व बकरे यांचा आयात परवाना व ह्यस्लॉट बुकिंगह्णसाठीही ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे. दरम्यान, देवनार पशुवधगृहात पशु बाजार तसेच धार्मिक पशुवधासाठी अन्य विविध प्रकारच्या व्यवस्था करण्यात आल्या आहेत. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर, महानगरपालिकेच्या बाजार विभागामार्फत ७ ते ९ जूनदरम्यान महानगरपालिका क्षेत्रात एकूण १०९ ठिकाणी धार्मिक पशुवधासाठी परवानगी देण्यात आली आहे. संबंधित ठिकाणी किंवा इतर ठिकाणी धार्मिक पशुवध करायचा असल्यास त्याच्या परवानगीकरिता यंदा माय बीएमसी या मोबाइल ॲप्लिकेशनमध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येईल. त्यासाठी नागरिकांना ॲपवर नोंदणी करावी लागेल. संबंधित जागा सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा खासगी मालकीची असल्यास अर्ज करताना ह्यना हरकत प्रमाणपत्रह्ण तसेच अर्जदाराचे ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा वाहन परवाना) अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. किती पशु आणि कोणत्या दिवशी धार्मिक पशुवध करायाचे आहे, याचा उल्लेख नागरिकांना अर्ज करताना करावा लागणार आहे. धार्मिक पशुवध करताना पालिकेने दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक असून त्यासंबंधी ॲपवर माहिती देण्यात आली आहे. धार्मिक पशुवधासाठी म्हैसवर्गीय प्राणी व बकरे आयात परवाना तसेच ह्यस्लॉट बुकिंगह्णसाठी ३३स्त्र२://६६६. ैंड्ढ५.ल्ल या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी नियंत्रण कक्ष आणि ९९३०५०१२९३ या क्रमांकावर मदतसेवा सुरू राहील. ४ ठिकाणी ध्वनिक्षेपक यंत्रणा तसेच नागरिकांच्या मार्गदर्शनासाठी फलकांच्या माध्यमातून दिशादर्शन व सूचना प्रदर्शित करण्यात येतील.

## आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांची सुरक्षा पोलिस कमिशनर, सुरक्षेचा आढावा करणार
# राज्य सरकारचा मोठा निर्णय

### शासनाचे आदेश काय?

- आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षेची गरज असेल तर त्यांना तात्काळ सुरक्षा पुरविण्यात यावी.
- काही काळ त्यांना राहण्यासाठी सुरक्षागृह ही प्रत्येक जिल्ह्यात तयार करण्यात यावीत.
- शासकीय विश्रामगृह असेल तर त्या ठिकाणी व्यवस्था करावी.
- जर शासकीय विश्रामगृह नसेल तर भाडेतत्त्वावरती घर खरेदी करून त्यांची व्यवस्था करण्यात यावी.
- या जोडप्यांच्या सुरक्षेचा प्रश्न असेल तर एफआयआर नोंदवून तात्काळ सुरक्षा पुरवली जावी.
- या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्यस्तरीय ११२ नंबरची हेल्पलाइन असणार.
- या कक्षाच्या संदर्भात दर तीन महिन्यांनी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यासंदर्भात आढावा घेऊन अहवाल तयार करतील.




■**मुंबई । प्रतिनिधी :** आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलली आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांची सुरक्षा आता स्वतः पोलिस आयुक्त करणार आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचे अनुदान बंद केल्याची चर्चा सुरू असताना सुरक्षेचा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे.

### सुरक्षेसाठी विशेष समिती गठीत

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा देण्यासंदर्भात विशेष कक्ष गठीत करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य कक्ष गठीत करण्यात आला आहे. या कक्षाचे प्रमुख पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक राहतील. सोबत जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी आणि महिला बालविकास विभागाचे अधिकारी सदस्य असतील. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त अशा जोडप्यांच्या सुरक्षेचा आढावा दर तीन महिन्यांनी घेणार आहेत.

## "फोन टॅपिंग होत असल्याने राज्यातील अधिकारी फोन उचलत नाही..."
# राष्ट्रवादी शरद पवार गटातील बड्या नेत्याचा आरोप

■**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात फोन टॅपिंगचा विषय पुन्हा चर्चेत येणार असल्याचे चिन्ह दिसत आहे. राज्यातील अधिकाऱ्यांच्या फोन टॅपिंगच्या घटना घडत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी केला. फोन टॅपिंगच्या प्रकारामुळे अर्ध्या महाराष्ट्रातल्या अधिकारी हे व्हाईस कॉलवर असतात. सचिव, अधिकारी अथवा पोलीस अधिकारी असो कॉल केल्यावर फोन उचलत नाही, या शब्दात एकनाथ खडसे यांनी नाराजी व्यक्त केली आहे.



एकनाथ खडसे यांनी म्हटले की, पोलीस अधिकारी असतील, तहसीलदार असो किंवा इतर उच्च अधिकारी यांना फोन केला की ते फोन घेत नाहीत. त्यांचे परत उत्तर सुद्धा येत नाही. अनेक अधिकाऱ्यांना फोन केल्यावर मी व्हिसीमध्ये आहे. बैठकीमध्ये आहे, असे सांगितले जाते. मात्र दिवसभर बैठका चालतात का? असा सवाल एकनाथ खडसे यांनी उपस्थित केला आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ, अशी घोषणा सरकारने केली. मात्र, अजितदादा आता म्हणतात, अशी घोषणा कोणी केली, त्यावर बोलताना एकनाथ खडसे म्हणाले, सरकार आपल्या शब्दापासून मागे जात आहे. २१०० रुपये तर लांब राहिले १५०० रुपये सुद्धा वेळेवर मिळत नाही. राज्य दिवाळखोरीवर आले आहे. कर्जबाजारी झाले आहे. ४६ हजार कोटी रुपये लाडक्या बहिणी योजनेसाठी लागतात. त्याचा परिणाम इतर योजनांवर झाला आहे. राजीव गांधी योजना, गोपीनाथ मुंडे कृषी योजनेचे पैसे सहा महिन्यांपासून मिळत नाही. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. त्यामुळे सरकारची दिवाळखोरी समोर आली आहे, असे एकनाथ खडसे यानी म्हटले आहे. कर्ज काढायचे आणि लाडक्या बहिणींना पैसे द्यायचे, कर्ज काढून कर्मचाऱ्यांचे पगार करायचे, अशी आजच्या सरकारची परिस्थिती आहे, असे एकनाथ खडसे यांनी म्हटले.



शरद पवार अजित पवार एकत्र येणार का? या प्रश्नावर खडसे म्हणाले की, गेला काय दिवसांपासून वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने शरद पवार आणि अजित पवार एकत्र दिसत आहेत. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील, अशा चर्चा सुरू आहे. मात्र या चर्चांना कुठलाही अर्थ नाही. एकत्रीकरणाचा कुठलाही संकेत कार्यकर्त्यांपर्यंत पक्षाच्या माध्यमातून आलेला नाही.

पोलीस
बातमी पत्र
मुंबई, मंगळवार, २० मे ते २६ मे २०२५


# सखी

## नैसर्गिक लुकसाठी लिपस्टिकऐवजी या गोष्टी वापरून पहा

सुंदर दिसण्यासाठी, लोक अनेक प्रकारच्या मेकअप टिप्स वापरतात आणि एक अतिशय खास मेकअप उत्पादने म्हणजे लिपस्टिक. जरी तुम्हाला मेकअप घातला पाहिजे असे वाटत नसले तरीही तुम्ही फक्त लिपस्टिक लावून सुंदर दिसू शकता. पण जर तुम्हाला तुमच्या ओठांवर पूर्णपणे नैसर्गिक लूक हवा असेल तर तुम्ही लिपस्टिकऐवजी काही इतर लिप उत्पादने वापरून पाहू शकता. ओठांना नॅचरल लुक दिल्याने ओठ आणि चेहरा या दोन्हींचे आकर्षण आणि सौंदर्य वाढते. आज आम्ही तुम्हाला नॅचरल लूकसाठी कोणत्या गोष्टी वापरायला हव्यात ते सांगत आहोत.






### लिप क्रेयॉन

जर तुम्हाला तुमचे ओठ गुळगुळीत करायचे असतील तर लिपस्टिकऐवजी लिप क्रेयॉनचा वापर करा. लिप क्रेयॉन लावण्याची फॅशन झपाट्याने वाढत आहे. या काजळच्या पेन्सिलसारख्या असतात, त्यांना धारदार करत राहा आणि लावत राहा. मॅट आणि ग्लॉस लिप क्रेयॉन्सच्या सहाय्याने तुम्ही तुमचे ओठ नैसर्गिक बनवू शकता. हे ओठांना मॉइश्चरायझ करतात.




### लिप लाइनर

लिपस्टिक लावण्यापूर्वी लिप लायनर वापरण्याची खात्री करा, त्याचा रंग तुमच्या लिपस्टिकच्या रंगासारखा असावा. जर तो अचूक जुळणारा रंग नसेल, तर तो असा असावा की तो त्याच्यापेक्षा वेगळा दिसत नाही. ओठांच्या आऊटलाइनवर लिप पेन्सिल लावा, लिप पेन्सिलने लिपस्टिक भरा, यामुळे लिपस्टिक जास्त काळ टिकून राहते. यानंतर ब्रशने ओठांवर लिपस्टिक नीट पसरवा.

### लिप ग्लॉस

ओठ चमकदार आणि रंगीबेरंगी किंवा नैसर्गिक दिसण्यासाठी लिप ग्लॉस हा एक चांगला पर्याय आहे. लिप ग्लॉस तुमच्या ओठांना मऊ आणि लवचिक तर ठेवतेच शिवाय एक सुंदर लुकही देते. लिपस्टिकप्रमाणे ते मेण, तेल आणि रंगद्रव्याच्या मिश्रणाने बनलेले असतात. पातळ ओठांसाठी लिपग्लॉस खूप चांगले आहे. हे ओठांवर एक चमकदार थर तयार करते, ज्यामुळे ओठ अधिक मोकळे आणि भरलेले दिसतात.




### लीप बाम

लिप बाम ओठांच्या पृष्ठभागावर एक थर तयार करतो, ज्यामुळे ओलावा बंद होतो आणि ओठ मऊ राहतात. लिप बाममध्ये असलेले मेण, पॅराफिन, लॅनोलिन इत्यादी ओठांना कोरडे ठेवतात आणि ते क्रस्ट होत नाहीत. तसेच चेहरा फ्रेश दिसतो. तुमच्या आवडीनुसार तुम्हाला शोभेल अशा शेडचे लिप बाम तुम्ही निवडू शकता.




## साबुदाण्याच्या फेसपॅकचे फायदे

साबुदाणा जेवढे पोटासाठी फायदेशीर आहे तेवढेच सौंदर्याच्या दृष्टीने देखील फायदेशीर आहे. साबुदाण्याची पेस्ट बनवून आपण चेहऱ्यावर लावल्याने चेहऱ्यावर चकाकी येते. हे पॅक बनवायला देखील सोपे आहे. चला जाणून घेऊ या बनवायची कृती आणि फायदे.



साबुदाण्यात व्हिटॅमिन बी ६ स्टार्च, आयरन, केल्शियम, कॉपर, सेलेनियम, सोडियम तत्व आढळतात याची पेस्ट बनवून लावल्याने चेहऱ्यावरील डाग नाहीसे होतात. हे फेस पॅक चेहऱ्यावर लावून १५ मिनिट ठेवा नंतर पाण्याने धुवून घ्या. त्वचेची चमक पुन्हा मिळेल.

साबुदाण्याचे फेसपॅक बनविण्यासाठी एका भांड्यात साबुदाणा घ्या त्यात लिंबाचा रस मिसळा. गॅसवर गरम करण्यासाठी ठेवा. मिश्रण शिजल्यावर गॅस बंद करून द्या. थंड झाल्यावर मिक्सरमध्ये वाटून घ्या. त्यात ब्राऊन शुगर आणि लिंबू, मुल्तानी माती मिसळा. फेसपॅक तयार आहे.



फायदे–

* हे फेसपॅक लावल्याने त्वचा मऊ आणि कोवळी होते.
* कोरडी त्वचेसाठी साबुदाण्याचे फेसपॅक फायदेशीर आहे.
* मुरुमांच्या समस्येपासून आराम मिळतो.
* त्वचा एक्सफॉलिएट करतो.



## सुंदर त्वचेसाठी साजूक तुपाचे घरगुती उपाय



तुपाचा वापर केवळ जेवणातच नाही तर आरोग्य आणि सौंदर्यासाठीही केला जातो. तूप वापरून तुम्ही कायम तरुण राहू शकता. तूप तुमचे आरोग्य आणि सौंदर्य कसे वाढवू शकते ते जाणून घेऊया. चला जाणून घेऊया शुद्ध तुपाचे १० सोपे घरगुती उपाय.

**१. तुपाची क्रीम:** तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर बाजारातून आलेली मॉइश्चरायझिंग क्रीम वापरता, पण आता देशी तुपाने घरी बनवलेले मॉइश्चरायझिंग क्रीम वापरून पहा. यासाठी एका भांड्यात एक कप तूप टाका आणि त्यात ५ चमचे थंड पाणी घालून चांगले मिक्स करा. सतत ढवळत राहा आणि वितळूनघ्या. तूप चांगले वितळेपर्यंत ही प्रक्रिया करा. यानंतर ते चेहऱ्यावर लावा.

**२. चेहऱ्यावरील डाग दूर करा:** एका मोठ्या भांड्यात १०० ग्रॅम साजूक तूप घेऊन त्यात पाणी घालून हलक्या हाताने फेणून घ्या आणि पाणी फेकून द्या. अशा रीतीने तूप अनेक वेळा धुवून वाडगा थोडावेळ वाकवून ठेवा, जेणेकरून जास्तीचे पाणीही बाहेर निघेल. आता या तुपात थोडे कापूर चांगले मिसळा आणि एका मोठ्या तोंडाच्या काचेच्या बाटलीत हे तूप भरून ठेवा, त्वचेच्या आजारांवर जसे की फोड येणे, खाज येणे या आजारावर हे एक उत्तम औषध म्हणून काम करेल. डाग, पिंपल्स आणि काळी वर्तुळे इत्यादी सर्व दूर होतात.

**३. तुपाने चेहऱ्याचा मसाज:** त्वचेचा कोरडेपणा कमी करण्यासाठी चेहऱ्याला तुपाने मसाज केल्यास चेहऱ्याचा हरवलेला ओलावा परत मिळण्यास मदत होते. एवढेच नाही तर डोक्याला तुपाने मसाज करणे केसांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. तुपाने डोक्याला मसाज केल्याने केस दाट आणि चमकदार होण्यास मदत होते.

**४. नाभीला तूप लावा:** नाभीवर तूप लावल्याने पोटातील आग शांत होते आणि अनेक प्रकारच्या आजारांवर फायदेशीर ठरते. यामुळे डोळ्यांना आणि केसांना फायदा होतो. शरीराची कंपन, गुडघे आणि सांधेदुखीवरही हे फायदेशीर आहे. यामुळे चेहऱ्यावरील ग्लो वाढते आणि ओठ मुलायम होतात.

**५. दृष्टी वाढवण्यासाठी उपयुक्त :** डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार शुद्ध देशी तुपाचा एक थेंब डोळ्यांमध्ये टाकल्याने जळजळ, वेदना इत्यादी दूर होतात आणि दृष्टी वाढते.

**६. तुपाने शरीरावर मसाज करा:** संपूर्ण शरीराला तुपाने मसाज केल्याने शरीरातील नसा मजबूत होतात आणि शरीराच्या आत आणि बाहेरील सूज मध्ये देखील आराम मिळतो. यामुळे शरीराचा थकवाही दूर होतो आणि चांगली झोप लागते. कोरड्या त्वचेला ओलावा देण्यासाठीही तुपाची मसाज प्रभावी आहे.

**७. ओठ मऊ आणि गुळगुळीत होतील:** देसी तूप सतत ओठांवर लावल्यास तडक्यांची तसेच भेगा पडण्याची समस्या दूर होते. याने काळेपणा नाहीसा होऊन ओठ मऊ व गुलाबी होतात.

**८. डोळ्यांखालील काळी वर्तुळे:** डोळ्यांखालील काळी वर्तुळे दूर करण्यासाठी रोज रात्री सतत साजूक तूप लावा, काही दिवसातच ती दूर होतील.

**९. सुरकुत्या आणि फ्रिकल्स:** हे लावल्याने चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि फ्रिकल्स हलक्या होऊ लागतात आणि हळूहळू त्वचा घट्ट होते.

**१०. केस मजबूत आणि काळे होतात:** साजूक तूप लावल्याने टाळूवरील कोरडेपणा आणि कोंडा दूर होतो आणि केस मजबूत होतात. हे अकाली केसांना पांढरे होण्यापासून प्रतिबंध करते.

## गुंतलेले आणि फ्रिजी केसांना मऊ करण्यासाठी हे ३ हेअर मास्क वापरा

*फ्रिजी केस असणे ही केसांची अशी स्थिति आहे ज्यामुळे केस कोरडे आणि निर्जीव दिसतात. केस नेहमीच कोरडे राहतात आणि केस नीटनेटके करायला कठिन जाते. या फ्रिजी केसांचे अनेक कारणे असू शकतात. जसे की प्रोटीन ची कमतरता, चुकीचे रासयनिक उत्पादक वापरणे हेअर टॉपिकलायझिंग टूल्सचा किफायतशीर वापर किंवा केसांची काळजी न घेणे. या सर्व परिस्थितीमुळे केसांचे पोषण नष्ट होऊन केस निर्जीव राहतात. आज या लेखात आम्ही तुम्हाला अशाच ३ हेअर मास्कबद्दल सांगणार आहोत, जे घरी सहज तयार करता येतात.*

### नारळ तेल आणि कोरफड जेल हेअर मास्क –

कुरळे केसांसाठी हेअर मास्क तयार करण्यासाठी तुम्ही हे घटक वापरू शकता–

साहित्य: नारळ तेल, आल्याचा रस, कोरफड जेल, मध, दही

कुरळे केसांसाठी हेअर मास्क बनवण्याची पद्धतः हा मुखवटा तुमचे केस फ्रीज फ्री करतो आणि त्यांना चमकदार बनवतो. एका भांड्यात २ चमचे खोबरेल तेल, १ चमचे आल्याचा रस, २ चमचे एलोवेरा जेल आणि १ चमचे मध घाला. सर्व साहित्य चांगले मिसळा. आता हे मिश्रण केसांना नीट लावा. हळूवारपणे मसाज करा आणि ३० मिनिटे सोडा. शेवटी, केस थंड पाण्याने चांगले धुवा.

### अंडी आणि ऑलिव्ह ऑइल हेअर मास्क–

साहित्य: ऑलिव्ह तेल, अंडी आणि तेल

केसांचा मास्क तयार करण्याची पद्धत: एका भांड्यात एक चमचा ऑलिव्ह ऑईल टाका आणि एक अंडे फोडून त्यात मिसळा. हे मिश्रण केसांना लावा आणि ३० मिनिटे ठेवा. नंतर केस धुवा. या हेअर मास्कमुळे केस मऊ होतात.



### मध आणि दही घालून तयार करा हेअर मास्क –

साहित्य: २ चमचे नारळ तेल, १ चमचे मध, १ चमचा दही

केसांचा मास्क तयार करण्याची पद्धत: खोबरेल तेल, मध आणि दही चांगले मिसळा. त्यानंतर केस धुण्यापूर्वी हे मिश्रण केसांना लावा. आता केसांना हळू हळू मसाज करा जेणेकरून मास्क संपूर्ण केसांमध्ये चांगला पसरेल. हेअर मास्क लावल्यानंतर गरम टॉवेलने केस झाकून ठेवा. यामुळे मास्कचा प्रभाव वाढतो. सुमारे ३०-४० मिनिटांनंतर, केस थंड पाण्याने चांगले धुवा. शेवटी, तुमचे केस ब्लो ड्राय करा आणि हा मास्क आठवड्यातून दोन-तीन वेळा वापरा. हा मुखवटा तुमच्या केसांना थंडपणा आणि आर्द्रता देतो. तुमचे केस आणि त्वचा निरोगी राहण्यासाठी तुम्ही ते नियमितपणे वापरू शकता.

## केसांना मेंदी लावण्याचे ५ सौंदर्यवर्धक फायदे

तुम्हाला हातावर मेंदी लावणे नक्कीच आवडत असेल. त्याचे सौंदर्यवर्धक फायदे जाणून घेतल्यावर ती तुम्हाला आवडणार. याचे सौंदर्यवर्धक फायदे जाणून घ्या.

जर तुम्ही केसांच्या समस्येने त्रस्त असाल तर मेंदी लावल्याने तुमच्या सर्व समस्या दूर होऊ शकतात. मेहंदी नैसर्गिक कंडिशनर म्हणून काम करते, ज्यामुळे तुमचे केस मऊ बनतातच पण केसांची वाढही होते.



चला जाणून घेऊया, केसांना मेहंदी लावल्याने कोणते सौंदर्यवर्धक फायदे होतात?

१. मेंदीमध्ये दही, आवळा पावडर, मेथी पावडर मिसळून घोळ तयार करा आणि केसांना लावा. १ ते २ तास केसांमध्ये ठेवल्यानंतर केस धुवा. असे केल्याने केस काळे, दाट आणि चमकदार होतात.

२. मेंदी वापरल्याने तुमचे केस लांब होतात. त्यात मेथीचे दाणे मिसळून ते लावल्याने त्याचे फायदे लवकर दिसतात.

३. केसांना कंडिशनिंग करण्यात मेहंदी खूप महत्त्वाची भूमिका बजावते. त्याचा सतत वापर केल्याने तुमचे केस दाट आणि मजबूत होतात. हे तुमच्या केसांच्या कोरड्या क्यूटिकलला मऊ करते आणि त्यांना चमक देखील आणते.

४. दह्यात मेंदी मिसळून त्यात लिंबाचा रस मिसळल्याने केसांमधील कोंड्याची समस्या दूर होते.

५. केस लांब आणि दाट करायचे असतील तर मेंदीमध्ये चहाच्या पानांचे पाणी मिसळा, रात्रभर भिजवा आणि सकाळी लावा. ते आठवड्यातून एकदा वापरले जाऊ शकते.असं केल्याने केस मऊ आणि दाट होतात.

## संपादकीय

# उरापोटी ? कोणासाठी ?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



कचराभूमीचीच जागा हवी, तर तिचे सपाटीकरण पालिकेने न करता प्राधिकरणानेच करण्याची अट सरकारला घालता आली असती.

उद्योगवाढ, त्यातून होणारी रोजगारनिर्मिती, आसपासच्या परिसराचा होणारा विकास यासाठी सरकारी यंत्रणेने उद्योगांना साह्य करणारी धोरणे राबवणे स्वाभाविक असते. उदारीकरणाच्या धोरणानंतर खासगीकरणाचे वारे देशात वाहू लागले आणि विविध क्षेत्रांमध्ये खासगीकरणाला प्रोत्साहन देताना खासगी उद्योगांना मदत होईल, अशी धोरणे सरकारने आखणेही नित्याचे ठरले. त्याचे काही चांगले परिणामही जाणवले. विशेषतः पायाभूत सुविधा क्षेत्रात खासगीकरणाने आमूलाग्र बदल झाले. तेव्हा काही ठरावीक उद्योगपतींनाच मदत होईल, अशी सरकारची वेळोवेळी भूमिका असल्याची टीकाही होऊ लागली आणि टूजी घोटाळा आदी प्रकरणांत ती टिपेला गेली. टीकेचा हा बार पुढे न्यायालयांत फुसका ठरण्याआधी राजकीय परिणाम झालाच. सरकार बदलले. पुढल्या काळात काही निर्णयही बदलले आणि प्राधान्यक्रम बदलले. त्यावर आताशा चर्चा होत नाही, याचे कारण सरकार कोणावरही मेहेरनजर करत नसून निर्णय रीतसर होत आहेत आणि त्यांची अंमलबजावणी विकास हेच उद्दिष्ट ठेवून होत आहे, असे सांगितले जाते. ते ठीकच. निर्णय रीतसरच होतात. पण अशा रीतसर निर्णयांत काही वेळा कमालीचे सातत्य आढळते, तेव्हा काहीएक ऊहापोह होणे क्रमप्राप्त ठरते.

असा ऊहापोह अजिबात न झाल्याचे एक उदाहरण धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे. विरोधी पक्षीयांनी धारावी पुनर्विकासाबाबत केलेली ओरड मागे पडली. आधी जुनी निविदा रद्द करण्यात आली. मग स्थानिकांचा विरोध मोडून काढण्यात आला. धारावी पुनर्विकास प्रकल्पात रेल्वेच्या जागेचा अडथळा होता. रेल्वेची २७ एकर जागा राज्य सरकारने अनेक वर्षे पाठपुरावा करून मिळत नव्हती. पण नंतर अशी काही सूत्रे हलली की, रेल्वेने आपली जागा धारावी प्रकल्पासाठी तात्काळ बहाल केली. एरवी रेल्वेची एक इंच जागा मिळविणे किती आव्हानात्मक असते, हे राज्य सरकारमधील अधिकाऱ्यांनी अनुभवले आहे. धारावीमध्ये राहणा[illegible]या सर्वांचे तेथेच पुनर्वसन करणे शक्य नाही असा तगादा निविदाकाराने सरकारपुढे लावला. मुंबईत सार्वजनिक उपक्रमासाठी जागा मिळणे हे मोठे दिव्य. मग कचराभूमी, मिठागरे, सरकारच्या जागांचा विचार सुरू झाला. मदतीला महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार तत्परच होते. मुंबईतील पाण्याचा निचरा होण्यासाठी मिठागरांची जागा मोकळी ठेवणे आवश्यक आहे, असे पर्यावरणतज्ज्ञ घसा फोडून सांगत आहेत. आयआयटीसारख्या नामांकित संस्थांमधील तज्ज्ञांनी असाच सल्ला दिला. पण धारावीकरांचे पुनर्वसन सरकारसाठी महत्त्वाचे होते. त्यापुढे पर्यावरण, पाण्याचा निचरा वगैरे प्रश्न गौण ठरले. लोकांच्या घराचा प्रश्न महत्त्वाचा हा सरकारचा उदार विचार! मग मुलुंड- भांडुपच्या मिठागरांची २५६ एकर जागा धारावी प्रकल्पाला देण्यात आली. मागे महाविकास आघाडी सरकारच्या काळातच मेट्रो कारशेडसाठी मिठागरांची जागा देण्यास केंद्र सरकारने किती आढेवेढे घेतले होते. पण आता केंद्र सरकारही कनवाळू झाले. त्याचबरोबर मढमधील १४० एकर जागा धारावी प्राधिकरणाला देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. मुंबईतील मोक्याची ४०० ते ४५० एकर जागा देऊनही धारावीकरांच्या पुनर्वसनासाठी जागा कमी पडत होती. अन्य जागांचा शोध घेण्यात आला. कुठला पर्याय नसल्यानेच बहुधा कचराभूमीही सोडण्यात आली नाही. मुंबईतील देवनारमधील जुन्या कचराभूमीची १२५ एकर जागा ताब्यात घेण्यात आली. हे इथेच संपले नाही.

या कचराभूमीच्या जागेवर ८ ते १० मजली इमारतींच्या उंचीएवढा कच[illegible]याचा ढीग आहे. धारावीकरांसाठी जागा एवढीच महत्त्वाची होती तर धारावी प्राधिकरणाला जागेचे सपाटीकरण करण्याची अट सरकारला घालता आली असती. पण हे कामही मुंबई महानगरपालिकेच्या गळ्यात मारण्यात आले. ११० हेक्टर जागेतील कचरा तेथून हटवून जागेचे सपाटीकरण करण्यात येणार आहे. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने २३६८ कोटींची निविदा नुकतीच प्रसिद्ध केली आहे. पुढील तीन वर्षांत देवनारच्या जागेतील कचरा हटवून जागेचे सपाटीकरण करण्यात येईल. नंतर त्या जागेत घरे बांधली जातील. महाराष्ट्र सरकार, मुंबई महानगरपालिका, मुंबईतील शहर व उपगर जिल्हाधिकारी कार्यालये, केंद्र सरकारमधील विविध विभाग हे सारे धारावी पुनर्विकास प्रकल्प मार्गी लागावा म्हणून जे जे नियमात बसते ते सारे बसवताहेत. खरे तर मुंबईत कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा गंभीर प्रश्न. कचरा टाकण्यासाठी पयार्यी जागा उपलब्ध नाही. देवनार आणि कांजूरमार्ग या दोनच जागा कचरा टाकण्यासाठी शहरात उपलब्ध. यापैकी कांजूरमार्गच्या जागेबद्दल उच्च न्यायालयाने अलीकडेच पालिकेला धारेवर धरले. या जागेचा वाद न्यायालयात असल्याने कचराभूमी कायम राहण्याचे मोठे आव्हान. अशा वेळी देवनारची जागाही धारावीच्या निमित्ताने आंदण. केवढे औदार्य महाराष्ट्र सरकार आणि मुंबई महानगरपालिकेचे.

देवनारची जागा साफ करण्यासाठी पालिकेला स्वतःच्या तिजोरीतून पैसे मोजावे लागणार आहेत. कदाचित ठेकेदाराकडून ते वसूल केले जातीलही. मुंबई महानगरपालिकेची आर्थिक अवस्था फार काही चांगली नाही. सध्या ठेवी मोडून पालिकेला प्रकल्पांसाठी खर्च करावा लागतो. त्यातच पालिकेचे दायित्वही दोन लाख कोटींपेक्षा अधिक. जकात कर रद्द झाल्याने शासनाकडून मिळणारी नुकसानभरपाई पालिकेसाठी महत्त्वाची ठरते. सध्या मुंबईत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या बांधकामांवरील करामुळे (प्रीमियम) पालिकेची तिजोरी किमान भरते तेवढाच दिलासा. पालिकेने महसुली उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने यंदाच्या आर्थिक वर्षात घनकचरा व्यवस्थापन कर उभारण्याची घोषणा अर्थसंकल्पात केली. त्यातून ७०० कोटींचे उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. एकीकडे नागरिकांवर घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी कर लागू करायचा आणि दुसरीकडे कचराभूमी साफ-सपाट करण्यावर खर्च करायचा अशी पालिकेची दुटप्पी भूमिका. देवनारमधील कचरा साफ करण्यासाठी पुढील तीन वर्षे दररोज १२०० ट्रक्स कचरा वाहून नेला जाणार आहे. महापालिकेत कचरा वाहून नेण्याच्या कामातील गैरव्यवहरार नेहमीच चर्चेत असतो. त्यात आणखी भर पडणार. तसेच कचरा वाहून नेण्याचे काम मिळविण्यासाठी टक्केवारी आली. त्यातच देवनारमधील कचऱ्यावर रासायनिक प्रक्रिया करून तो इतरत्र टाकण्यात येणार असला तरी जेथे कचरा टाकला जाईल तेथे प्रदूषण, पर्यावरणाचे प्रश्न उद्भवतील. तसेच कचरा आपल्या भागात टाकण्यास स्थानिकांचा होणारा विरोध वेगळाच. धारावी पुनर्विकासासाठी शहराच्या वेगवेगळ्या भागांतील जागा धारावी प्राधिकरणाला देण्याचा सपाटाच लावण्यात आला आहे.

सरकारी यंत्रणांची लगबग या एका धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी सुरू आहे खरी. पण मिठागरांच्या जागा इमारतींनी व्यापल्यावर भविष्यात पाण्याच्या निचऱ्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. राजधानी दिल्लीसह बंगळूरु, चेन्नई, कोचीसारख्या मोठ्या शहरांमध्ये सध्या अशाच कारणांमुळे पावसाळ्यात पुराचा फटका बसण्याचे प्रकार वाढले आहेत. दोन-चार वर्षांत मुंबईत पूर्व द्रुतगती मार्गावर हाच प्रश्न भेडसावू लागण्याची भीती व्यक्त केली जाते. पाण्याच्या निचऱ्याचे स्त्रोत बंद करू नका, अशी विनवणी पर्यावरणवादी हात जोडून करीत असताना शासकीय यंत्रणांना त्याच्याशी काहीही देणेघेणे दिसत नाही. धारावी, बीडीडी चाळी, अभ्युदय नगर अशा जुन्या मुंबईची ओळख असलेल्या भागांचे पुनर्वसन त्याच जागी करता येईल, हे शहर नियोजनतज्ज्ञ वारंवार सांगत आहेत. १९८०च्या दशकात मुंबईत जागेची कृत्रिम टंचाई निर्माण करण्यात आली आणि मुंबईतले भूखंड हे अर्थकारणासह राजकारणाचेही साधन ठरले. भविष्यात निती आयोगाच्या सूचनेवरून मुंबई महानगराचा आर्थिक विकास केंद्र म्हणून विकास करण्यात येईल तेव्हाही हे धारावी प्रारूपच वापरणार का हा प्रश्न आहे.

अर्थात धारावी प्रकल्पाबद्दल सत्ताधारी आणि त्यांच्या हातातील यंत्रणांची उरापोटी राबतानाची तत्परता पाहता हे सारे कशासाठी यापेक्षाही कोणासाठी हा प्रश्न मोठा. त्याचे उत्तर हे धारावीचे उघड

# ‘विकसित भारता’साठी...




आपल्या देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. तेव्हापासून ते आजपर्यंत अनेक अडचणींवर मात करून आपण जो प्रवास केला तो निश्चितच अभिमानास्पद असा आहे. आज भारत हा सर्वाधिक वेगाने - म्हणजे सरासरी ६.५ टक्के दराने आर्थिक प्रगती करत असलेला जगातील एकमेव देश आहे. आपली अर्थव्यवस्था सन २०२८मध्ये जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणार आहे. तेव्हा आपला जीडीपी ५.७२ ट्रिलियन डॉलर, तर शताब्दी वर्षात ३० ट्रिलियन डॉलर असेल, असा अंदाज असून, ही निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे. सन २०४७नंतरही आपली अर्थव्यवस्था जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था म्हणून पुढील अनेक वर्षे राहणार आहे. असे असूनही गरिबी, बेरोजगारी, असमानता, सामाजिक सुरक्षा अशा विविध स्तरांवर आपली अर्थव्यवस्था कमी पडत आहे. संपूर्ण भारताचा विकास करण्यासाठीच ‘विकसित भारत २०४७’ ही संकल्पना मोदी सरकारने जाहीर केली आहे. समाजातील सर्व घटकांचा सहभाग असल्याखेरीज ही संकल्पना साकार होऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे आपल्या अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या दरात आणखी किमान दोन टक्के वाढ आवश्यक आहे. म्हणजे तो आठ ते नऊ टक्के झाला तर विकसित भारत हा २०४७मध्ये प्रत्यक्षात येईल; अन्यथा त्यास आणखी पाच ते दहा वर्षे लागतील. ‘विकसित भारत २०४७’ ही संकल्पना यशस्वी करणे वाटते तेवढे सोपे काम नाही. पण त्यादृष्टीने प्रयत्न केले तर अशक्यही नाही. सन २०४७पर्यंत देशाला स्वावलंबी आणि समृद्ध अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्याचे सरकारचे ध्येय म्हणजे ‘विकसित भारत २०४७’. आर्थिक वाढ, तांत्रिक सुधारणा, पायाभूत सुविधांचा विकास, सामाजिक सक्षमीकरण आणि शाश्वतता हे या कार्यक्रमाचे निकष आहेत. सन २०२५-२६च्या केंद्रीय अर्थसंकल्पात हे साध्य करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम अर्थसंकल्पात नमूद केलेल्या या धोरणानुसार संधी निर्माण करण्यासाठी आणि प्रगतीला चालना देण्यासाठी काही प्राधान्यक्रम जाहीर केले होते. यामध्ये शून्य भूकबळी, दर्जेदार व सर्वांना परवडणारे शिक्षण, रोजगारक्षम कौशल्य विकास, महिला सबलीकरण, शेतकरी कल्याण यांचा समावेश आहे. समाजातील घटकांच्या व लाभार्थीच्या विकसित भारत २०४७ या संकल्पनेसंबंधी सूचना, अनुभव, अपेक्षा आपण www.mygov.in या वेबसाइटवर नोंदवू शकता.

या पार्श्वभूमीवर काही गोष्टी विचार करण्याजोग्या आहेत. इंदूर हे शहर भारतातील सर्वांत स्वच्छ शहर म्हणून आपले स्थान सलग १० वर्षे टिकवून आहे. त्याचप्रमाणे इंदूर हे शहर हे नुकतेच (१० मे २०२५ रोजी) ‘भिकारीमुक्त’ म्हणून घोषित झाले. हे केवळ इंदूरमधील नागरिकांच्या सहभागामुळे शक्य झाले. हे जर इंदूरमध्ये होऊ शकते, तर अन्यत्र का नाही? मुंबईत धारावीचा पुनर्विकास होत आहे. चेंबूर, अँटॉप हिल्स, सायन कोळीवाडा, मालवणी येथेदेखील अशा प्रकारच्या वस्त्या आहेत. पुण्यातदेखील पाटील इस्टेट, दत्तवाडी, जनता वसाहत, गोखले नगर येथे देखील अशा जागा आहेत. या सर्व ठिकाणी पुनर्विकास प्रक्रिया सुरू केल्यास रहिवाशांच्या राहणीमानात खूप चांगले बदल होतील. विकसित भारत २०४७ या मोहिमेत देशातील सर्व नागरिकांचे सहकार्य व सहभाग मिळाला तर विकसित भारताचे हे उद्दिष्ट कदाचित सन २०४७च्या दोन-तीन वर्षे आधीच साध्य होऊ शकते. सशक्त भारतीय, समृद्ध आणि शाश्वत अर्थव्यवस्था यांद्वारे भारताला विकसित राष्ट्रात रूपांतर करण्याची क्षमता आहे. यात आर्थिक वाढ, पर्यावरणीय शाश्वतता, सामाजिक प्रगती आणि सुशासन यासारख्या विकासाच्या विविध पैलूंचा देखील समावेश आहे. जागतिक बँकेच्या व्याख्येनुसार ज्या देशांचा जीडीपी हा दरडोई १४,००६ अमेरिकी डॉलर इतका असेल अशी राष्ट्रे ‘विकसित’ म्हणून घोषित केली जातात. भारताचा २०२५चा जीडीपी हा दरडोई २,८८० अमेरिकी डॉलर आहे. २०४७ या वषार्तील वाढती महागाई व राहणीमानाचा विचार केला तर जागतिक बँकेच्या व्याख्येनुसार आपल्या देशाचा जीडीपी हा दरडोई १७,६३५ डॉलकपर्यंत वाढला तरच आपण ‘विकसित देश’ म्हणून घोषित होऊ. याचाच अर्थ आपल्याला आपल्या अर्थव्यवस्थेचा विकासदर हा दर वर्षी सुमारे १० टक्के करावा लागेल, तेव्हा कुठे आपण या जागतिक बँकेच्या व्याख्येप्रमाणे ह्यविकसित राष्ट्रह्न म्हणून घोषित होऊ शकतो. क्षणभर हा मुद्दा आपण बाजूला ठेवला व आपला दर वर्षीचा सरासरी आर्थिक विकासदर हा आठ टक्के जरी गाठू शकलो तरी २०४७ या वर्षात आपला दरडोई जीडीपी १४ हजार अमेरिकी डॉलर होऊ शकेल. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे चलनांच्या खरेदी शक्ती समतेचा विचार केला तर २०४७ या वर्षात आपला दरडोई जीडीपी नऊ ते दहा हजार अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचला तरी आपला देश हा खऱ्या अर्थाने ‘विकसित भारत’ होऊ शकतो. भारतातील चांगले राहणीमान हे अमेरिकेच्या तुलनेत खूप स्वस्त आहे. जागतिक बँकेने केलेली विकसित देशाची केलेली व्याख्या ही केवळ पाश्चिमात्य विकसित देशापुरती लागू आहे, असे माझे मत आहे. विकसनशील किंवा अविकसित देश यांना ही व्याख्या कितपत लागू होईल, याबाबत मी साशंक आहे. इतर देशांच्या चलनांचा तुलनात्मक विचार केला तर, अमेरिकी डॉलरची किंमत विनाकारण, अवास्तव वाढलेली आहे, असे आपल्या असे लक्षात येईल. भारताच्या दृष्टीने विचार करता अमेरिकी डॉलरचे जागतिक व्यापारातील महत्त्व हळूहळू कमी होत जाईल व भारतीय रुपया सक्षम होण्यास त्याची मदत होईल. नजीकच्या भविष्यकाळात भारतीय रुपया केवळ स्थिरच होईल असे नाही, तर सक्षमही होईल. अमेरिकेतील ट्रम्प सरकारच्या आयात-निर्यात कर प्रणाली धोरणामुळे जागतिक बाजारपेठेत असंतुलन, मंदीसदृश, तसेच अस्थिर वातावरण आहे. जगातील अनेक देशांशी भारताने रुपयात आयात निर्यात धोरण करार केल्यामुळे सक्षम होणार रुपया, सुमारे ५० देशांशी मुक्त व्यापार, विविध देशांच्या समूहांशी आयात-निर्यात करार यामुळे आपली निर्यात वाढेल, तसेच आयात कमी खर्चात होईल. यामुळे उत्पादकांचा फायदा वाढेल, भारतीय ग्राहकांना वस्तू थोड्या कमी किमतीत मिळतील. परिणामी महागाईवरही नियंत्रण करता येईल. आपल्या आर्थिक समृद्धीसाठी या बाबी साह्यभूत आहेत. अर्थात, आणखी २२ वर्षांचा कालावधी जायचा आहे. या प्रवासात काही अडचणीदेखील येतील; पण आपण त्या अडचणींवर मात करू शकतो, हा आत्मविश्वास आपल्या अर्थव्यवस्थेच्या रचनेत आहे ही एक जमेची बाब आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे रोजगार, आर्थिक उत्पन्न, राहणीमान यात सकारात्मक बदल होतील.

# हवाई संरक्षणाचा केंद्रबिंदू : आकाशतीर




भारत-पाकिस्तानमधील विविध मोक्याच्या ठिकाणी असलेल्या ८ तळांसह १३ लक्ष्यांवर इतक्या अचूकपणे मारा कसा करू शकला? पाकिस्तानचा पूर्णपणे धुव्वा कसा उडाला? असे प्रश्न जगभरातील तज्ज्ञांना पडले असून ते आश्चर्यचकित झाले आहेत. ९ आणि १० मे दरम्यानच्या रात्री, जेव्हा पाकिस्तानने क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने भारतीय लष्करी आणि नागरी क्षेत्रांवर सर्वात मोठे हल्ले केले, तेव्हा अभेद्य, भारतीय स्वसंरक्षण भिंतीने ते पूर्णपणे विफल केले. या भिंतीचे नाव - आकाशतीर . या आकाशतीर प्रणालीनेच पाकिस्तानी हवाई ड्रोन, क्षेपणास्त्रे, इतर छोटी वअश म्हणजे मानवविरहित हवाई वाहने आणि हवेतल्या इतर शस्त्रास्त्रांना नेस्तनाबूत केले आणि त्यांना भारतीय हवाई क्षेत्रात प्रवेश करण्यापासून रोखले. आकाशतीर पूर्णपणे स्वदेशी उत्पादन असून आत्मनिर्भर भारताची क्षमता यातून प्रतिबिंबित झाली आहे. आकाशतीरच्या तुलनेत, पाकिस्तानची सुरक्षा प्रतिसाद प्रणाली वेळेवर प्रक्षेपास्त्र शोधण्यात आणि भेदण्यात पूर्णपणे अपयशी ठरली. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले. पाकिस्तानच्या सुरक्षा प्रतिसाद कवचामध्ये ल्दद-९ आणि ल्दद-१६ यांचा समावेश होता. ह्यआकाशतीरह्न, पूर्णपणे स्वयंचलित संरक्षण प्रणाली असून रिअल-टाइम लक्ष्य तिने अडवली आणि ड्रोन युद्धप्रकारात ती अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. आकाशतीर सर्व संबंधितांना (नियंत्रण कक्ष, रडार आणि हवाई संरक्षण मारकांना) सामायिक रिअल टाइम चित्र पुरवते, जेणेकरून समन्वित हवाई कारवाया सक्षम होतात. शत्रूची विमाने, ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे आपणहून शोधणे, त्याचा माग राखणे यासाठी ही प्रणाली तयार करण्यात आली आहे. विविध रडार यंत्रणा, सेन्सर्स आणि वेगवेगळ्या कम्युनिकेशन टेक्नालॉजीज एकाच संचालन चौकटीत या प्रणालीद्वारे जोडण्यात आल्या आहेत. आकाशतीर अनेक स्त्रोतांकडून डेटा गोळा करते, त्यावर प्रक्रिया करते आणि स्वयंचलित, वास्तविक वेळेतल्या स्थितीनुसार निर्णय घेणे शक्य करते. आकाशतीर हे विस्तृत C4ISR (कमांड, कंट्रोल, कम्युनिकेशन्स, कंप्यूटर, इंटेलिजेंस, सर्व्हेलन्स आणि रिकौनीसन्स) चौकटीचा भाग आहे, जी इतर प्रणालींशी समन्वय साधून काम करते. आकाशतीरची खुबी बुद्धिमत्ता आधारित युद्धतंत्रात आहे. हवाई संरक्षणाची पारंपरिक प्रारूपे मुख्यत्वेकरून जमिनीवर स्थित रडार्स, मानवी देखरेख यंत्रणा आणि कमांड साखळ्यांद्वारे चालवल्या जाणाऱ्या हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र संचांवर अवलंबून असतात. आकाशतीर या चौकटीपलीकडील आहे. तिचे तंत्र युद्धक्षेत्रात कमी पातळीवरील हवाई क्षेत्राचे निरीक्षण आणि जमिनीवर आधारित हवाई संरक्षण शस्त्र प्रणालींचे कार्यक्षम नियंत्रण शक्य करते. आपल्या रणनीती सिद्धांतामधला नवा अध्याय आकाशतीर आहे. बचावात्मक दृष्टिकोन मागे टाकून दहशतवादी धोक्यांना सक्रिय प्रत्युत्तर असा बदल तिने घडवून आणला आहे. पाकिस्तानने भारताला अण्वस्त्रांच्या धमक्या देऊ नयेत, भारत ते सहन करणार नाही आणि पाकिस्तानच्या भूमीत पोसल्या जाणाऱ्या दहशतवादाला भारत चोख प्रत्युत्तर देईल, हे पंतप्रधानांनी स्पष्ट केलं आहे. आपल्या लष्करी साठ्यात आकशतीरचा समावेश आपला आत्मविश्वास वाढवणारा आहे. दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानविरुद्ध हवाई संरक्षण सिद्धता आकाशतीर पुरवते. जगभरातले तज्ज्ञ आता आकाशतीरला ‘युद्ध रणनीतीतला भूकंपीय बदल’ म्हणून संबोधत आहेत. आकाशतीरमुळे भारत पूर्णपणे स्वयंचलित आणि एकात्मिक एडी सी अँड आर (म्हणजे हवाई संरक्षण नियंत्रण आणि हवाई धोके ओळखून त्याची माहिती देण, अशी) क्षमता प्राप्त केलेल्या प्रतिष्ठित राष्ट्रांच्या पंक्तीत विराजमान झाला आहे. थोडक्यात सांगायचे, तर आकाशतीरने हे दाखवून दिले आहे की, ती जगाने वापरलेल्या कोणत्याही गोष्टींपेक्षा वेगाने पाहते, निर्णय घेते आणि प्रहार करते. ही प्रणाली वाहन आधारित आहे त्यामुळे तिचे वहन शक्य आहे आणि प्रतिकूल वातावरणात हाताळण्यास ती सुलभ आहे. या प्रणालीत अशा वैविध्यपूर्ण घटकांचा समावेश करण्यात आला आहे ज्यामुळे आपल्याच बाजूवर चुकून मारा केल्या जाण्याच्या शक्यता कमी होतात, शत्रूला त्वरित प्रत्युत्तर दिले जाते. एकात्मिक सेन्सर्समध्ये टॅक्टिकल कंट्रोल रडार रिपोर्टर, थ्रीडी टॅक्टिकल कंट्रोल रडार्स, लो-लेव्हल लाइटवेट रडार आणि आकाश अस्त्र प्रणाली असलेल्या रडारचा समावेश आहे. आकाशतीरमधला सर्वात महत्त्वपूर्ण घटक म्हणजे हवामान, भूप्रदेश, रडार इंटरसेप्ट्स अशा बहुविध घटकांकडून डेटा संकलित करण्याची आणि रिअल-टाइम निर्णय घेण्यापासून, मोहिमांना पुनर्निर्देशित करणे आणि स्वयंचलित हल्ला करण्यापर्यंतची तिची बहुविध क्षमता. ‘हे आम्ही पूर्वी पाहिले आहे त्या कित्येकपट पलीकडले आहे,’ अशी प्रतिक्रिया अनेक पाकिस्तानी संरक्षण तज्ज्ञांची आहे.

जगभरातूनदेखील अशाच प्रतिक्रिया येत आहेत. आकाशतीर लष्करी हवाई संरक्षणाच्या (AAD)च्या सर्वात कमी ऑपरेशनल युनिट्सना अखंड आणि एकीकृत हवाई चित्र पुरवते, जे संपूर्ण सैन्यात समन्वय आणि परिस्थितीजन्य जागरूकता वाढवते. आकाशतीर मानवी हस्तक्षेप आणि विकेंद्रीकरण टाळून स्वयंचलन आणि कार्यक्षमता देखील वाढवते. भारतीय हवाई दल (IACCS), भारतीय नौदल (TRIGUN) आणि भारतीय लष्कराच्या (AKASHTEER)च्या एडी सी अँड आर नेटवर्कच्या एकात्मिकतेमुळे युद्धभूमीची स्थिती स्पष्ट होण्यात क्रांतिकारी बदल घडला आहे आणि गतिज आणि बिगर-गतिज भू आधारित हवाई संरक्षण शस्त्र प्रणालीचा समन्वित वापर सुनिश्चित झाला आहे.

पोलीस बातमी पत्र
संमिश्र
मुंबई, मंगळवार, २० मे ते २६ मे २०२५


# उल्हासनगरात दिवसाढवळ्या नशेखोरांची दहशत!
## बंजारा कॉलनीत तलवारी-चॉपरने नागरिकांवर हल्ला, ३ जण गंभीर



**■उल्हासनगर** : उल्हासनगरात नशेच्या धुंदीत बेशिस्तपणाचे थैमान सोमवारी सकाळपासून पाहायला मिळाले. तलवारी, चॉपर आणि चाकूंनी सज्ज झालेल्या गुन्हेगारी वृत्तीच्या तरुणांच्या टोळक्याने भर रस्त्यावर रक्ताचा खेळ मांडला. महिलांपासून सामान्य नागरिकांपर्यंत कोणालाही न बघता धारदार शस्त्राने हल्ले करत या टोळक्याने परिसरात दहशतीचं वातावरण निर्माण केलं. या प्रकारामुळे 'पोलिस कुठं आहेत?' हा प्रश्न या प्रकाराने गर्भगळित झालेल्या प्रत्येकाच्या ओठांवर आहे.

उल्हासनगर कॅम्प ४ मधील बंजारा कॉलनीत सोमवारी सकाळी घडलेली एक धक्कादायक घटना सध्या शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. काही नशेखोर तरुणांनी तलवारी, चॉपर आणि चाकूंसह रस्त्यावर उतरत अक्षरशः आतंक माजवला. या हल्ल्यांत तिघे गंभीर जखमी झाले असून महिलांवर हल्ल्याचा प्रयत्न, घरांवर दगडफेक आणि पाळीव प्राण्यांवर देखील अमानुष हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी सकाळी सुमारे ६ वाजता नरेश श्रीवास्तव हे भाजीपाला घेण्यासाठी घराबाहेर पडले असताना या नशेत असलेल्या गुन्हेगारी वृत्तीच्या टोळक्याने त्यांच्यावर अचानक धारदार शस्त्रांनी हल्ला केला. नरेश यांच्या डोक्यावर आणि हातावर घाव घालण्यात आले असून ते सध्या रुग्णालयात उपचार घेत आहेत.

नंतर थोड्या वेळाने याच टोळक्याने रघुनाथनगर बंजारा कॉलनी परिसरात राफा कुटुंबाच्या घराबाहेर येत त्यांच्या पाळीव कुत्र्यावर क्रूरपणे हल्ला केला. हे पाहून अश्विनी राफा यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या दिशेनेही शस्त्र उगारण्यात आले. अश्विनी यांचा भाऊ आणि शेजारी त्यांना वाचवायला धावून आले, परंतु या तरुणांनी त्यांच्यावरही तलवारी, चाकू आणि चॉपरने हल्ला केला. यात दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हल्लेखोरांनी राफा यांच्या घरावरही चाकू, चॉपर आणि तलवारीने तुफान हल्ला चढवला.

**१०० आणि ११२ वर फोन करूनही मदत नाही...**

नागरिकांनी घटना घडल्यानंतर तातडीने पोलिसांची मदत मागण्यासाठी १०० आणि ११२ या आपत्कालीन क्रमांकावर अनेक वेळा कॉल केले. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे या क्रमांकावरून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही असा आरोप राफा कुटूंबीयाने केला आहे. तोपर्यंत आरोपींनी हल्ले करून पळ काढला होता. आपत्कालीन सेवेतील या दुर्लक्षामुळे संतप्त नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ह्यपोलिस मदतीला वेळेवर पोहोचत नसतील, तर अशा सेवा कोणासाठी?ह्व असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# ई-ऑफिस प्रणालीचा नागरिकांना ताप...
## वेळेच्या खोळंब्यामुळे नागरिक आणि कर्मचारी यांच्यात वाद




**या ठिकाणी काम करण्यासाठी एकच कर्मचारी**

ई -ऑफिस प्रणालीचे काम करण्यासाठी याठिकाणी तीन संगणक, प्रिंटर असले तरी त्याठिकाणी काम करण्यासाठी एकच कर्मचारी असल्याचा दावा यावेळी निकम यांनी केला आहे. त्यामुळे आलेले प्रत्येक पत्र घेऊन ते स्कॅन करून संबधीत विभागाकडे पाठविण्याच्या प्रक्रियेला साधारणपणे पाच ते सात मिनिटांचा कालावधी जात आहे. त्यामुळे रांग देखील वाढत असल्याचे चित्र याठिकाणी दिसून आले आहे.

**■ठाणे** : मोठा गाजावाजा करत ठाणे महापालिकेत सुरू करण्यात आलेल्या ई-ऑफिस प्रणालीचा नागरिकांना भलताच ताप झाला आहे. रांगेत एक दोन तास खोळंबून राहिलेल्या नागरिक आणि कर्मचारी यांच्यामध्ये खटके उडत असून अनेक वेळा वादाला आमंत्रण मिळत आहे. काही नागरिकांनी तर हाच गतिमान कारभार असेल तर जुन्याच प्रणालीनुसार कारभार करा, असा सल्ला देखील पालिका प्रशासनाला दिला आहे.


शासकीय कार्यालयातील दैनंदिन कामकाज सुलभ, पारदर्शक व गतिमान पद्धतीने कामे व्हावीत, यासाठी १ एप्रिलपासून ठाणे महापालिकेत ई-ऑफिस कार्यप्रणालीची सुरुवात करण्यात आली. ही प्रणाली उत्तम असली तरी एखादा अर्ज किंवा निमंत्रण द्यायचे झाल्यास येणाऱ्या नागरिकाला त्यासाठी रांगेत उभे राहून एक ते दीड तासाचा अवधी जात असल्याची बाब समोर आली आहे. त्यातही तेथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून रोज किती अर्ज करता, आम्हाला काय एकच काम आहेत का? अशा पद्धतीने बोलून नागरिकांशी हुज्जत घालण्याचे काम करीत असल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे. त्यामुळे ही कार्यप्रणाली चांगली असली तरी देखील ठाणेकरांना वेळ तर वाया जात आहेच, शिवाय कर्मचाऱ्यांकडून त्यांना बोलणी देखील खावी लागत आहेत.

महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या मिशन शंभर दिवस या उपक्रमातंर्गत ई -ऑफिस कार्यप्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. महापालिकेच्या माध्यमातून राबविले जाणारे प्रकल्प, निमंत्रण, अर्ज करायचे झाले तरी देखील आता या ई -ऑफिसचा पर्याय ठाणे महापालिकेने उपलब्ध करून दिला आहे. तसेच ई -ऑफिस कार्यप्रणालीमुळे कोणत्याही कामाचा प्रस्ताव एक ते दोन दिवसात मार्गी लागण्यास मदत होणार आहे. शिवाय या कामामध्ये सुसूत्रता व पारदर्शकता देखील राहणार आहे. तसेच प्रत्येक प्रस्तावाला ई-नंबर दिला जाणार असून संबंधित प्रस्ताव कोणत्या अधिकाऱ्यांच्या स्तरावर आहे किंवा त्यास विलंब झाला याचे देखील ट्रेकिंग ठेवण्यात येणार आहे. त्यानुसार ठाणेकरांना देखील एखादा अर्ज करायचा झाल्यास त्यासाठी देखील या प्रणालीचा वापर केला जात आहे.

परंतु जेव्हापासून ही प्रणाली कार्यान्वित झाली आहे, तेव्हापासून ठाणेकरांचा वेळ मात्र मुख्यालयात वाढत असल्याचे चित्र आहे. त्यातही एक अर्ज किंवा साधे निमंत्रण जरी द्यायचे झाले तरी देखील त्यासाठी रांगेत एक ते दीड तास उभे रहावे लागत आहे.

दुसरीकडे मनसेचे संतोष निकम हे महापालिका मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्रात गेले असता, त्यांचा पाऊण तासाहून अधिकचा वेळ रांगेत गेलाच, शिवाय त्यांनी कर्मचाऱ्यांकडून देखील चुकीची वागणूक मिळाली आहे. सारखे अर्ज करून तुम्ही आमचा वेळ वाया घालवत आहात, किती अर्ज करणार आम्हाला काय तेच काम आहे का?, त्यातही संबधींत कर्मचाऱ्याला नाव विचारले असता ते तर सांगितले नाहीच, शिवाय त्याच्या गळ्यात ओळखपत्र देखील नसल्याचे दिसून आले आहे. तसेच यावेळी सुरक्षारक्षांकरवी शारीरिक बळाचा वापर करून धमकावण्याचा प्रयत्न देखील झाल्याची बाब दिसून आली आहे. या संदर्भात त्यांनी अतिरिक्त आयुक्तांकडे पत्रव्यवहार केला आहे.

# नालेसाफसफाई युद्धपातळीवर सुरू



ड्रेन मास्टर यंत्रांला उभयचर प्रकारचे यंत्र असे म्हणतात. हे यंत्र पाण्यावर तरंगून तसेच जमिनीवरून किंवा ड्राय नाल्यांमधून गाळ काढण्याचे काम करते. या यंत्रामध्ये गाळ गोळा करण्यासाठी विशेष प्रकारची बीन्स यंत्रावरच उपलब्ध करून दिलेली आहेत, यामुळे ज्या नाल्यांच्या धक्क्यावर इमारती आणि घरे आहेत अशा ठिकाणी नाले साफ करणे खूप शक्य झाले आहे. या यंत्रामुळे हायड्रॉलिक लेग आणि काही गाळ वाहत्या पाण्यात अडकल्यामुळे, यंत्र पाण्यात स्थिर करून ते काढले जात आहे.

**■विरार** : वसई-विरार महापालिकेने शहरातील नाल्यांची सफाई करण्यासाठी ड्रेन मास्टर ही अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणली असून त्याद्वारे नाल्यांची साफसफाई करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी पोकलेन मशीन किंवा जेसीबी पोहचू शकत नाही, अशा ठिकाणच्या नाल्यातील गाळ काढण्यासाठी या यंत्राचा वापर केला जात आहे. अशा प्रकारची यंत्रसामुग्री वापरणारी दिल्ली नंतरची वसई-विरार ही दुसरी महानगरपालिका ठरली आहे.

वसई विरार पालिकेकडून शहरातील नाल्याची साफसफाई करण्यात येत आहे. त्यासाठी ९ प्रभागात नालेसफाईचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. आजपर्यंत एकूण ४५% हून अधिक नालेसफाईचे काम पूर्ण झाले आहे. नालेसफाई करताना ज्या ठिकाणी पोकलेन यंत्र किंवा जेसीबी पोहचू शकत नाही, अशा ठिकाणी पाण्यातून किंवा दलदलीच्या भागातून गाळ काढण्यासाठी पालिकेने ड्रेन मास्टर या आधुनिक यंत्राचा वापर सुरू केला आहे. तर नाले साफसफाई करण्यासाठी लॉंग बूम 21, शॉर्ट बुक ३१, जेसीबी २०, ड्रेन मास्टर २, डंपर २५, अशा यंत्रांचा समावेश आहे.

ड्रेन मास्टर यंत्रांला उभयचर प्रकारचे यंत्र असे म्हणतात. हे यंत्र पाण्यावर तरंगून तसेच जमिनीवरून किंवा ड्राय नाल्यांमधून गाळ काढण्याचे काम करते. या ड्रेन मास्टर नावाच्या एका यंत्राची किंमत १ लाख ७४ हजार असून पालिकेने १५ व्या वित्त आयोगातून ३ लाख ४८ हजारांची दोन ड्रेन मास्टर यंत्रे विकत घेतली आहे. नाल्यांमधील गाळ यांत्रिक पद्धतीने काढण्यासाठी ड्रेन मास्टर या यंत्राचा वापर करत आहोत. हे यंत्र कॉम्पॅक्ट स्वरूपाचे असून त्यामुळे नाल्यातील गाळ पूर्णपणे काढून टाकला जात आहे. दलदलीच्या भागात व जास्त पाण्याचा ठिकाणी हे यंत्र चेन स्प्रॉकेटने सहज काम करत आहे.

सध्या नालेसफाईचे काम जोरात सुरू असून या यंत्रांच्या माध्यमातून नालेसफाई अधिक परिणामकारक होत आहे, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त (घनकचरा) नानासाहेब कामठे यांनी दिली. दिल्ली महापालिकेत या ड्रेन मास्टर यंत्राचा वापर करून नालेसफाई केली जात आहे. दिल्ली नंतर अशा यंत्राचा वापर करणारी वसई विरार ही दुसरी महापालिका ठरली आहे.

# अवकाळीचा कुंभार व्यावसायिकांना फटका



**■भिवंडी** : ठाणे जिल्ह्यात मार्च ते मे हे तीन महिने कुंभारांकडून पिण्याच्या पाण्याचे माठ उत्पादन आणि विक्री करण्याचा व्यवसायिक हंगाम असतो. मात्र गेल्या काही दिवसांपासून ऐन मे महिन्यात पाऊस सुरु असल्याने त्याचा परिणाम कुंभार व्यवसायावर झाला आहे. भिवंडीत तेलगू समाज मोठ्या संख्येने असल्याने चैत्र पाडव्याच्या दिवशी दरवर्षी नवीन माठाची पूजा करून त्यामधील पाणी पिण्यास सुरुवात करतात. या दिवशी हजारोंच्या संख्येने मठाची विक्री होते. त्यामुळे भिवंडीच्या दृष्टीने उन्हाळ्याचे माठ विक्री करण्याची सुरुवात या दिवसांपासून सुरु होते. घरगुती वापराकरिता शहरातील कुटुंबे उन्हाळ्यात थंड पाणी पिण्यासाठी माठ विकत घेतात. त्याच प्रमाणे भिवंडीत सुरु असलेल्या विविध व्यवसायाच्या आस्थापनेत कामगारांना पाणी पिण्यासाठी ठिकठिकाणी माठ अथवा मोठी रांजण विकत आणतात. यंत्रमाग कारखाने, डाईंग,सायझिंग,गोदामे आदी मध्ये लाखोंच्या संख्येने कामगार काम करीत असल्याने शहरात माठ आणि रांजणे मिळून लाखाच्या संख्येने विक्री होते. एप्रिल आणि मे या दोन महिन्यात माठाची विक्री मोठ्या संख्येने असल्याने शहरातील व्यावसायिकांनी आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी माठाचा साठा करून ठेवला होता. पावसाळा सुरु झाल्याने त्यांचे माठाचे ग्राहक कमी झाले तर पाऊस झाल्याने भट्टी लावता येत नसल्याने ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात माठ बनविण्याचे बंद झाले. त्यामुळे उत्पादन करणारे आणि विक्री करणाया कुंभारांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे.

# बदलत्या हवामानामुळे ठाणेकर सर्दी, खोकल्याने बेजार
## खासगी दवाखान्यात रुग्णांच्या संख्येत वाढ




**■ठाणे** : दोन दिवस सतत पडलेल्या अवकाळी पावसामुळे वातावरणात लक्षणीय बदल झाला असून बदलत्या हवामानामुळे ठाणेकर खोकला आणि सर्दीने बेजार झाले आहेत.

काही दिवसांपासून वातावरणात होत असलेल्या बदलाचा, नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिसत आहे. महापालिकेच्या आरोग्य केंद्रासह खाजगी दवाखान्यांमध्ये थंडी तापासह, सर्दी, खोकलाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. त्यात खोकला आजार हा औषध उपचार करून देखील लवकर बरा होत नसल्यामुळे रुग्ण या आजारांनी बेजार झाले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात होत असलेले बदल, कधी थंडी तर, कधी कडक उन्ह तर, कधी पाऊस याचा फटका नागरिकांच्या आरोग्याला बसत आहे. सर्दी, खोकला आणि अंगदुखीने नागरिक त्रस्त झाल्याचे दिसत आहे. अनेकजण यावर घरच्या घरी उपचार घेत आहेत. तर, काहीजण घराजवळील दवाखान्यात किंवा शासकीय आरोग्य केंद्रांवर उपचारासाठी गर्दी करत आहेत. यामध्ये बहुतांश रुग्ण हे सर्दी, खोकला आणि अंगदुखीने त्रासलेले आहेत. तर, दुसरीकडे अवकळी पाऊस, उन्ह, वाटवरणात याचं निर्माण होणार गारवा यांमुळे उद्भवणाऱ्या साथरोगांचा सामना करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे.

तसेच मलेरिया या आजारचे मागील वर्षी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून जानेवारी २०२४ आणि मे २०२४ या चार महिन्याच्या कालावधीत ५२ हजार १२७ रक्ताचे नमुणे गोळा केले होते. त्यात ६५ जणांना मलेरियाची लागण झाली होती. तर, यंदा याच काळात ८२ हजार ६३३ रक्ताचे नमुणे गोळा केले असून त्यापैकी ८९ जणांना लागण झाली होती.

दरम्यान, ठाणे पलिका क्षेत्रात जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२५ या कालावधीत टायफाईडचे, हगवणचे, डायरेयाचे, स्वाईन फ्लुचे, लेप्टोचे, क्वॉलर आणि स्वाईन फ्लुचा एकही रुग्ण आढळून आला नसल्याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आलेल्या आकडेवारी वरुण समोर आली आहे. त्यामुळे ठाणे पालिका क्षेत्रात सर्दी, खोकला आणि अंगदुखीने ताप झाला असला तरी, दुसरीकडे मात्र, साथरोग आटोक्यात आल्याचे दिसून येत आहे.

# सिडकोत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी पैशांची मागणी?
## व्हॉट्सअॅप मेसेजमुळे खळबळ, व्यवस्थापनाकडून चौकशी सुरू




दरम्यान, अशा प्रकारच्या कुठल्याही मेसेजला कर्मचाऱ्यांनी बळी न पडता ज्या कर्मचाऱ्यांकडे अशा प्रकारची डिमांड कोणी केली असेल तर त्यांनी थेट आपल्याशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. काही दिवसांपूर्वी नवी मुंबई महापालिकेतील १२ कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीत पैसे घेतल्याचा आरोप प्रशासनावर करण्यात आला होता. सदर आरोपाची चौकशी करण्यासाठी महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी कनिष्ठ अभियंत्यांच्या पदोन्नतीला स्थगिती देत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांची या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती गठित केली होती.

**■नवी मुंबई** : सिडकोतील मलईदार विभागात बदलीसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून प्रत्येकी दोन ते अडीच लाख रुपयांची मागणी केली जात असल्याचा मेसेज सिडकोतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर व्हायरल झाल्यामुळे सिडकोतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या वादात सापडल्या आहेत. या व्हायरल मेसेजमध्ये पैसे घेणाऱ्या अथवा देणाऱ्या व्यक्तीचे नाव नसले तरी देखील या मेसेजची व्यवस्थापनाने दखल घेतली असून चौकशी केली जात असल्याचे सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक-१ राजा दयानिधी यांनी सांगितले.

एकीकडे नवी मुंबई महापालिकेत कनिष्ठ अभियंत्यांच्या पदोन्नतीत पैसे घेतल्याचा मेसेज सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता सिडकोतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये देखील पैशांची डिमांड केली जात असल्याचा मेसेज व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे साडेबारा टक्के योजना विभागात काम करणाऱ्या एका कार्यालयीन सहाय्यकाद्वारे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडे फोन करून पैशांची डिमांड केली जात असल्याचा मेसेज सिडको अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर फिरू लागल्याने सिडको वतुर्ळात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या चर्चेचा विषय झाला आहे. दरम्यान, या व्हायरल मेसेजबाबत सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी यांच्याकडे देखील काही कर्मचाऱ्यांनी तक्रार नमूद केली आहे. त्यामुळे दक्षता विभागाकडून देखील या व्हायरल मेसेजप्रकरणी चौकशी सुरू झाली आहे.

मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी देखील याबाबत तपास सुरू असल्याचे नमूद केले. तसेच असे प्रकार खपवून घेतले जाणार नसून अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या बदल्या अथवा पदोन्नती या पारदर्शक व नियमानुसारच केल्या जातील. त्याकरिता कोणीही पैशांची डिमांड करत असल्यास त्याबाबत तत्काळ व्यवस्थापनाला संपर्क साधण्याचे आवाहन राजा दयानिधी यांनी केले आहे.

# रायगड जिल्ह्यात मधमाशांच्या हल्ल्यात ४० हून अधिक ग्रामस्थ जखमी



**■अलिबाग** : रायगड जिल्ह्यात पुन्हा एकदा मधमाशांनी हल्ला केल्याचा प्रकार घडला आहे. यावेळी मधमाशांच्या हल्ल्यात ४२ ग्रामस्थ जखमी झाले आहेत. गंभीर बाब म्हणजे यात १३ बालकांचा समावेश आहे. कोळवटमध्ये ग्रामदेवतेची आरती सुरू असताना सोमवारी (१२ मे) ही घटना घडली. जखमींवर म्हसळा आणि माणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. म्हसळा तालुक्यातील कोळवट गावात सोमवारी सकाळी ९ वाजता ग्रामदेवतेची आरती सुरू होती. ग्रामस्थ आणि मुंबईकर गावदेवाच्या मंदिरात आरतीसाठी आले होते. अचानक मधमाशांनी ग्रामस्थांवर हल्ला केला. या हल्ल्यामुळे ग्रामस्थ घाबरून पळू लागले. मधमाशांच्या डंखाने अनेक ग्रामस्थ जखमी झाले. सर्व जखमींना तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यातील दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. मशमाशांच्या हल्ल्याची माहिती मिळाल्यानंतर सर्व जखमीना तातडीने १०८ रुग्णावाहिकेतून म्हसळा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. म्हसळा ग्रामीण रुग्णालय आणि म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर तसेच कर्मचाऱ्यांनी शिवाय १०८ रुग्णवाहिकेकडून तत्परता दाखवल्याने ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# पेणच्या मोसिनला देशविरोधी मेसेज टाक्यासाठी अटक



**■अलिबाग** : देशविरोधी मेसेज सोशल मीडियावर टाकून दोन धर्मियांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पेणमधील मोसिन मुजावर याला सोमवारी (१२ मे) पहाटे नवी मुंबईतून अटक करण्यात आली. मोसिन मुजावरला तुर्भे रेल्वे स्टेशनमधून ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती पेण पोलिसांनी दिली. पेण पोलीस उपविभागीय अधिकारी गजानन टोंपे यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलिस ठाण्यांच्या पथकाने तांत्रिक तपास करत मोसिनचा शोध घेतला. पेणमधील मोसिन मुजावर या तरुणाने 3 एप्रिल रोजी दुपारी पावणेबाराच्या सुमारास भारताविरोधी चिथावणीखोर पोस्ट केली. सोशल मीडियावर ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर आयुष किरण शहा, पेण यांनी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे अध्यक्ष साईराज कदम यांच्याशी चर्चा करून 9 मे रोजी पेण पोलिसांकडे फिर्याद दाखल केली. पोलिसांनी त्याची सोशल मीडियावरील पोस्टची खात्री केल्यानंतर मोसिनविरोधात गुन्हा दाखल केला. मोसिनने त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन फियार्दी आयुष शहाला पोस्ट पाठवली. ह्यइंडिया के रुल्स की तहेस नहेस हो गई है, संभलके रहो हमारे पास तो तलवारे, बॉम्ब, मिसाईल सब रेडी है, देख रहा है ना इराण सब लेके बैठा है! जो भी मुस्लिम को तकलीफ देगा एक मिनिट मे उडा देगा वो, एक दिन इंडिया भी हमारा होगा, पुरा कब्जा हमारा होगा, और हम मस्त दबा के मारेंगेह्ण असे चिथावणीखोर आणि चुकीची माहिती फियार्दी आयुष शहा यांना देवून त्यांच्या मनामध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. भारत-पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती असताना मोसिन मुजावर याने दोन धर्मियांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मोसिन पेणचा असला तरी मुंबईला राहतो आणि त्याचे वडील अरब देशात नोकरी करतात. मोसिनच्या पोस्टनंतर पेण तालुक्यासह रायगडमध्ये खळबळ उडाली होती.

# वसईच्या दांम्पत्यावर फिलीपिन्समध्ये काळाचा घाला
## बाईकवरुन फिरताना ट्रकने उडवले



**■पालघर** : पर्यटनासाठी फिलीपिन्सला गेलेल्या पालघर जिल्ह्यातील वसईमधील एका दाम्पत्याचा दुर्दैवी अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. स्थानिक चर्चच्या अधिकाऱ्यांनी मंगळवारी ही माहिती दिली. त्यांच्या पश्चात एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. सविस्तर माहितीनुसार, ते वसईतील सँडोर परिसरात वास्तव्यास होते. जेराल्ड परेरा (५०) आणि त्यांची पत्नी प्रिया (४६) हे १० मे रोजी फिलीपिन्समधील सेबू प्रांतातील बाडियान या पर्यटनस्थळी भाड्याने घेतलेल्या दुचाकीवरून फिरत होते. दरम्यान, एका फिलीपिन्स नागरिकाने बेदरकारपणे टोयोटा हिलक्स ट्रकने ओव्हरटेक करताना त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघेही रस्त्यालगतच्या सिमेंटच्या विद्युत खांबावर आदळले. या भीषण अपघातात प्रिया यांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या जेराल्ड यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला. परेरा दाम्पत्याचे मृतदेह भारतात आणण्याची प्रक्रिया सुरू आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com